# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 14 April 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १४ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०

****

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह उत्साहात सुरू
- गरीब, शेतकरी, युवा आणि महिला भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्याच्या केंद्रस्थानी
- काँग्रेसची भाजपच्या जाहीरनाम्यावर टीका

आणि

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकाता संघासमोर लखनऊ संघाचं १६२ धावांचं आव्हान

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी आज मुंबईत चैत्यभूमी इथं बाबासाहेबांच्या स्मारकाला अभिवादन केलं. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं नवीन मतदारांची नोंदणी वाढवणं आणि मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या दृष्टीनं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज चैत्यभूमी परिसरात मतदार जनजागृतीसाठी विशेष स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाला राज्यपाल बैस यांनी भेट देऊन स्वाक्षरी फलकावर स्वाक्षरी करून सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन केलं.

****

बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं आणि राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा संदेश बाबासाहेबांनी आपल्या सर्वांना दिला आहे.

बाबासाहेबांनी तयार केलेल्या घटनेला अनुसरून राज्याचा कारभार सुरू असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. राज्य शासनानं इंदू मिलच्या जागी भव्य स्मारक उभं करायला सुरुवात केली असून, नागपूरमधील दीक्षा भूमीचं जतन, संवर्धन यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं लंडनमधील घर खरेदी करून त्याचं संग्रहालयात रूपांतर करून शासनानं बाबासाहेबाना खरी मानवंदना दिली असल्याचं मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

****

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर इथं दीक्षाभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं. बाबासाहेबांनी कायमच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा पुरस्कार केला, ते समाजसुधारणेचे अग्रणी होते अशा शब्दांत त्यांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. बाबासाहेबांनी समाजानं दूर सारलेल्या घटकांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्यात स्वाभिमान जागृत केला असं पवार यांनी या निमित्त आपल्या संदेशात म्हटलं आहे.

****

राज्यभरात ठिकठिकाणी जयंतीनिमित्त विविध उपक्रम, फेऱ्या, मिरवणुका सुरू आहेत. शासकीय आस्थापनांत जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नागपूरमध्येही डॉ. आंबेडकर यांच्या जयंतनिमित्त उत्साहाचं वातावरण आहे. संविधान चौक इथं काल रात्री बारा वाजता बाबासाहेबांचा जयघोष करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. नागपूर आकाशवाणीत अभिवादन कार्यक्रम झाला. वर्धा इथं महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आज बाबासाहेबांच्या विचारांच्या अनुषंगानं राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आलं. नागपूरच्या दीक्षाभूमीत अभिवादनासाठी जनसागर लोटला आहे. नागपूर लोकसभा मतदारसंघातील एनडीए आघाडीचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दीक्षाभूमीवर जाऊन अभिवादन केलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यातून प्रत्येकानं प्रेरणा घेण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रचलेले संविधान हे आज घडीला वाचवणं, लोकतंत्राला वाचवणं ही खरी गरज आहे. या संविधानामुळं सामान्य नागरिकाला आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळेल असं प्रतिपादन काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नागपूर इथं केलं. दीक्षाभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला भेट दिल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानावर सर्व चालतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली तसंच संविधान असेल तोपर्यंत बाबासाहेबांचं नाव अमर राहील असंही खर्गे यावेळी म्हणाले.

****

गरीब, शेतकरी, युवा आणि महिला या चार घटकांना केंद्रस्थानी ठेवून 'सब का साथ सब का विकास' या तत्त्वाच्या आधारे विविध योजनांची आश्वासनं देणारा भारतीय जनता पक्षाचा निवडणूक जाहीरनामा भाजपचे नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत जाहीर केला. गरिबांना शिधापत्रिकेवर मोफत अन्नधान्य देण्याची योजना पुढची पाच वर्षं चालू ठेवण्याचा, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी घरं बांधण्याचा, तसंच ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक नागरिकापर्यंत आयुष्मान भारत योजना पोहोचवण्याचा संकल्प या जाहीरनाम्यात व्यक्त केला आहे. एक देश एक निवडणूक, एकसामायिक मतदारसंघ, आणि पेपरफुटीविरोधी कायदा करण्याचं आश्वासनही भाजपनं याद्वारे दिलं आहे.

****

निवडणुका आल्यानं भारतीय जनता पक्षाला शेतकरी, छोटे व्यापारी, तरुणांची आठवण झाली असल्याची टीका काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. त्यांनी आज नागपूर इथं पत्रकारांशी बोलताना भाजपनं सत्तेत असताना दहा वर्ष शेतकरी, छोटे व्यापारी, तरुणांना वाऱ्यावर सोडल्याचा आरोप केला. समान नागरी कायद्याचं आश्वासन तर मागील निवडणुकीतही दिलं होतं मग आतापर्यंत भाजपनं त्याची अंमलबजावणी का केली नाही, त्यांना कोणी रोखले होते का, असा प्रश्न पटोले यांनी उपस्थित केला. वर्ष २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपनं जे सांगितलं तेच मुद्दे आजच्या जाहीरनाम्यात आहेत. जनता आता या फसव्या आश्वासनांना बळी पडणार नाही, असं त्यांनी नमूद केलं.

****

मराठा समाजाला लवकरात लवकर इतर मागास वर्ग– ओबीसीमधून आरक्षण नाही दिलं तर येत्या पाच जूनपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू करायचा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्यांनी आज चैत्यभूमी इथं वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. मराठा समाजही विधानसभा निवडणुकीची तयारी करेल, असंही पाटील यांनी यावेळी सांगितलं.

****

जालना शहर तसंच जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात येत आहे. जालना शहरातल्या मस्तगड इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच रांग लागली होती. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. या ठिकाणी रक्तदान शिबिरासह आरोग्य तपासणी, फराळ वाटप आदी उपक्रम घेण्यात आले. जयंतीनिमित्त आज शहरात भव्य मिरवणूक काढण्यात येत आहे.

****

लोकशाही समृद्ध आणि बळकट करण्यासाठी बाबासाहेबांनी सामान्य नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला, असं प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे यांनी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये केलं. त्यांचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात `डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि प्रबळ लोकशाही करीता मतदानाचं महत्त्व`, या विषयावर व्याख्यान झालं, त्यावेळी डोळे बोलत होते. मतदान निर्भयपणे करता यावं, अशी सुद्धा तरतूद बाबासाहेबांनी केली असल्याचं ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी होते.

****

छत्रपती संभाजीनगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात जयंतीनिमित्त डॉ. अरविंद गायकवाड यांचं `राष्ट्रनिर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर` या विषयावर व्याख्यान झालं. बाबासाहेबांनी घटना निर्मीतीबरोबरच ऊर्जा, विद्युत, जल धोरण देखील ठरवल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यावेळी अध्यक्षस्थानी होते.

****

महसूल गुप्तचर संचालनालयानं शिताफीनं केलेल्या एका कारवाईमध्ये वन्यजीवांच्या अवशेषांची तस्करी करणाऱ्याला ताब्यात घेतलं असून त्याच्याकडचा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये घोरपडीच्या ७८१ 'हात जोडी' तसंच साडे १९ किलोहून अधिक वजनाचे प्रवाळ याचा समावेश आहे. मुंबईच्या अधिकाऱ्यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे सापळा रचून नाशिक जिल्ह्यामध्ये नंदगाव रेल्वेस्थान परिसरात तीन तासांपेक्षा अधिक काळ चाललेल्या कारवाईत ही अटक केली. महसूल गुप्तचर संचालनालयाला स्थानिक संबंधित अधिकाऱ्यांचं यात सहकार्य मिळालं. तस्करांनी आदिवासी वस्तीवर बोलावून या पथकावर दगडफेक केली आणि पळून जाण्याचा प्रयत्न केल्यानंतर सुमारे अर्धा किलोमीटर पाठलाग करून तस्कराला अटक करण्यात आल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

आज १४ एप्रिल, हा दिन 'राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिन' म्हणूनही पाळला जातो. १४ एप्रिल १९४४ ला मुंबई बंदरात 'एस. एस. फोर्ट स्टिकीन' या बोटीमधील दारूगोळ्याच्या साठ्यानं पेट घेतला होता. त्यानंतर उसळलेल्या भीषण आगीवर नियंत्रण मिळविताना मुंबई अग्निशमन दलातील ६६ अधिकारी आणि सैनिकांना वीरगती प्राप्त झाली होती. अग्निशमन विभागातर्फे आज मुंबईमध्ये सेवा बजावताना आजवर वीरगती प्राप्त झालेल्या अधिकारी आणि सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता इथं लखनऊ सुपर जायंटस संघानं कोलकाता नाईट रायडर्स संघासमोर विजयासाठी १६२ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. आतापासून थोड्यावेळापुर्वी कोलकाता संघानं चौथ्या षटकात दोन बाद ४२ धावा केल्या आहेत. आज संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातला सामना वानखेडे मैदानावर होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथले सेवानिवृत्त शिक्षक सुधाकर तुळशी यांचं आज सकाळी वृद्धापकाळानं निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. महावितरणचे दक्षता अधिकारी प्रशांत तुळशी आणि दैनिक सामनाचे सहाय्यक संपादक गणेश तुळशी यांचे ते वडील होत. आज संध्याकाळी सात वाजता त्यांच्या पार्थिव देहावर प्रतापनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.